# महाराष्ट्र शासन
## उच्च शिक्षण संचालनालय
## महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१

Web : www.dhepune.gov.in E-Mail : mavi.dhepune@gov.in

फोन नं. ०२० / २६१२२११९, २६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३९. फॅक्स नं.- ०२०/२६१११११५३


क्र.उशिसं/२०१५/स्वयंघोषणापत्र/मवि-१ / ८३८३ दिनांक- 22 AUG 2015

प्रति,

१. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे.

२. प्राचार्य , राज्यातील सर्व महाविद्यालये.

**विषय :- शासकीय सोयी / सुविधाकरिता शपथपत्राऐवजी स्वघोषणापत्र व कागदपत्रांच्या स्वयंसाक्षांकित प्रती स्वीकारणे.**

**संदर्भ :-** १. शासन पत्र क्र. संकीर्ण-२०१५/ प्र.क्र. १२४/१५/ आस्था-२ , दि.३१.०७.२०१५

२. शासन निर्णय क्र. प्रसुधा १६१४/३४५/प्र.क्र.७१/१८-अ, दि.०९.०३.२०१५

उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयान्वये शासकीय कार्यालयांमध्ये शपथपत्राऐवजी स्वयंघोषणापत्र व कागदपत्रांच्या स्वयंसाक्षांकित प्रती स्वीकारण्याबाबतची अंमलबजावणी करण्याबाबतचे निर्देश शासनाने दिलेले आहेत.(संदर्भिय शासन निर्णयाची प्रत संलग्न.)

सदर शासन निर्णयात नमूद केल्यानुसार आपल्या विद्यापीठांत / महाविद्यालयांत कोणत्या बाबींसाठी अर्जासोबत शपथ पत्र दाखल करणे आवश्यक आहे आणि कोणत्या बाबींसाठी शपथ पत्र दाखल करणे बंधनकारक नाही यांची तपशीलवार यादी तयार करून विद्यापीठ / महाविद्यालयांच्या प्रसिध्दी फलकांवर त्याचबरोबर आपल्या संकेतस्थळांवर जनतेच्या माहितीसाठी प्रसिध्द करावी.

उपरोक्त विषयाबाबत त्वरीत कार्यवाही करावी व केलेल्या केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संबंधित सहसंचालक कार्यालयाकडे सादर करण्यात यावा.

(डॉ.व्ही. आर. मोरे)
सहसंचालक
उच्च शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य , पुणे- १

प्रत-

१. सर्व विभागीय सहसंचालक- उपरोक्त विषयाबाबतचा आपल्या अधिनस्त कार्यालये, सर्व महाविद्यालये / विद्यापीठे यांनी केलेल्या कार्यवाहीचा एकत्रित अहवाल संचालनालयास सादर करण्यात यावा.

२. मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई -३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.

## महाराष्ट्र शासन

अतितात्काळ/कालमर्यादा

क्रमांक: संकीर्ण-२०१५/प्र.क्र.१२४/१५/आस्था-२,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: ३१ जुलै, २०१५.

शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१. -4 AUG 2015 आवक क्रमांक:- 14259 शाखा:- मवि -१

प्रति,

**सह सचिव/उप सचिव,**
**(व्यवसाय शिक्षण/महाविद्यालयीन शिक्षण/विद्यापीठ शिक्षण/**
**तंत्र शिक्षण/कला/ग्रंथालये),उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.**

**विषय:** शासकीय सोयी/सुविधाकरिता शपथपत्राऐवजी स्वघोषणापत्र व कागदपत्रांच्या स्वयंसाक्षांकित प्रती स्विकारणे.

**संदर्भ:-** सामान्य प्रशासन विभागाचे दि. १६ मे, २०१५ रोजीचे पत्र आणि दि. ९ मार्च, २०१५ रोजीचे शासन निर्णय.

मवि-१

संदर्भाधीन सामान्य प्रशासन विभागाचे दि. १६ मे,२०१५ रोजीचे पत्र आणि दि. ९ मार्च, २०१५ रोजीच्या शासन निर्णयाची प्रत सोबत जोडण्यात येत आहे. सदर पत्र आणि शासन निर्णयान्वये शासकीय कार्यालयांमध्ये शपथपत्राऐवजी स्वघोषणापत्र व कागदपत्रांच्या स्वयंसाक्षांकित प्रती स्विकारणेबाबतची अंमलबजावणी करणेबाबतचे निर्देश दिलेले आहेत.

२. सामान्य प्रशासन विभागाने सोबतच्या शासन निर्णयात नमूद केल्यानुसार शासकीय कार्यालयात कोणत्या बाबींसाठी अर्जासोबत शपथपत्र दाखल करणे आवश्यक आहे आणि कोणत्या बाबींसाठी शपथपत्र दाखल करणे बंधनकारक नाही, याची तपशीलवार यादी करुन आपल्या अखत्यारीतील संचालनालये तसेच त्यांच्याशी संबंधित कार्यालयांमध्ये प्रसिध्दी फलकांवर जनतेच्या माहितीसाठी प्रसिध्द करावी व माहिती शासनाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करावी आणि केलेल्या कार्यवाहीचा अहवाल ७ दिवसांत आस्था-२ कार्यासनास पाठवावा, ही विनंती.

**( पा. म. तांकटे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत:** **संचालक,**
**(तंत्र शिक्षण/व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण/उच्च शिक्षण/कला/ग्रंथालय),**
**संचालनालय, महाराष्ट्र राज्य.**
निवडनस्ती.

श्री. चौगुले 6/8

**शासकीय सोयी /सुविधाकरिता शपथपत्राऐवजी स्वघोषणापत्र व कागदपत्रांच्या स्वयंसाक्षांकित प्रती स्विकारणे.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः प्रसुधा १६१४/३४५/प्र.क्र.७१/१८-अ**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: ०९ मार्च, २०१५

**वाचा :-** १) माहिती तंत्रज्ञान, सामान्य प्रशासन विभाग , शासननिर्णय क्र. MH- ९०२१ /११/२०१३ - DIT (MH)/ ३९ दिनांक १४/०८/२०१३.
२) माहिती तंत्रज्ञान, सामान्य प्रशासन विभाग, शासन शुध्दीपत्रक क्र. MH- ९०२१ /११/२०१३ - DIT (MH)/ ३९ दिनांक १५/१०/२०१३.

**प्रस्तावना -**

शासकीय कार्यालये, स्थानिक स्वराज्य संस्था इ. शासकीय संस्थांकडून नागरिकांना विविध अनुज्ञप्ती, दाखला व शासकीय सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यात येतात. याकरिता अर्जासह विहित नमुन्यातील शपथपत्रे सादर करावी लागतात. तसेच मुळ कागदपत्रांच्या राजपत्रित अधिकारी / विशेष कार्यकारी अधिकारी /इतर सक्षम अधिका-यांनी साक्षांकित केलेल्या प्रती सादर कराव्या लागतात. यामुळे नागरिकांना होणारी असुविधा दूर करण्यासाठी शासकीय कार्यालयांमध्ये शपथपत्र, प्रमाणपत्र तसेच साक्षांकित प्रती ऐवजी शक्य तेथे स्व घोषणा प्रमाणपत्र तसेच स्वयंसाक्षांकित प्रती स्विकृत करण्याची एक कार्यपध्दती अंमलात आणण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे.

**शासन निर्णय -**

महाराष्ट्र शासनाच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय कार्यालये, स्थानिक स्वराज्य इत्यादि शासकीय संस्थामध्ये विविध दाखले, अनुज्ञप्ती व इतर शासकीय सेवा / सुविधा प्राप्त करुन घेण्याकरिता नागरिकांना सादर करावे लागणारे शपथपत्र (Affidavit), तसेच मुळ प्रमाणपत्रे/ कागदपत्रे यांच्या राजपत्रित अधिकारी/ विशेष कार्यकारी अधिकारी इत्यादी. सक्षम अधिकाऱ्यांनी साक्षांकित केलेल्या प्रती (Attested copies) सादर कराव्या लागतात. परिणामी नागरिकांची गैरसोय होते. ही गैरसोय दूर करण्याकरिता प्रचलित कार्यपध्दती अधिक सुलभ करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

**संदर्भाधीन शासन निर्णय अधिक्रमित करुन सर्व शासकीय कार्यालये, स्थानिक स्वराज्य इत्यादि शासकीय संस्थामध्ये शपथपत्र (Affidavit), ऐवजी स्वयं घोषणापत्र (Self Declaration) व प्रमाणपत्रे / कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती (Attested copies) ऐवजी स्वयंसाक्षांकित प्रती ( Self Attested Copies) स्वीकृत करण्या संदर्भात पुढीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत -**

अ) **शपथपत्र (Affidavit) ऐवजी स्वयं घोषणा पत्र (Self-Declaration) स्विकारणे -**
शासकीय कामकाज तसेच सेवा/ सुविधांकरिता अनेक शासकीय कार्यालयांकडून अर्जासह शपथ पत्राची मागणी करण्यात येते. जेथे जेथे विद्यमान कायदा/ नियम

याव्दारे शपथपत्र अर्जासह सादर करणे आवश्यक आहे. तेथे शपथ पत्र सादर करणे आवश्यक राहील. मात्र जेथे अशा प्रकारे शपथपत्र बंधनकारक नाही. तेथे शपथ पत्राची मागणी करण्यात येऊ नये. त्या सर्व प्रकरणी शपथपत्राऐवजी स्वघोषणापत्र (Self Declaration) घेण्यात यावे. स्वघोषणापत्र प्रपत्र -अ॰ प्रमाणे राहील.

ब) **मुळ प्रमाणपत्रे/ कागदपत्रे यांच्या (Attested copies) साक्षांकित प्रतीऐवजी स्वयं साक्षांकित प्रती ( Self Attested Copies) स्वीकारणे :-**

शासकीय कामकाज तसेच शासकीय सेवा / सुविधा करिता अर्जासह मुळ प्रमाणपत्रांच्या/ कागदपत्रांच्या प्रती राजपत्रित अधिकारी / विशेष कार्यकारी अधिकारी /इतर सक्षम अधिका-यांनी साक्षांकित केल्यानंतर स्विकारल्या जातात. जेथे जेथे विद्यमान कायदा / नियम याव्दारे अशा साक्षांकित प्रतींची आवश्यकता आहे. तेथे अशा साक्षांकित प्रती सादर करणे आवश्यक राहील. मात्र जेथे अशा प्रकारे साक्षांकन बंधनकारक नाही त्या सर्व प्रकरणी स्वयं साक्षांकित प्रती स्विकारण्यात याव्यात. तेथे साक्षांकित प्रतींची मागणी करण्यात येऊ नये. मात्र स्वयंसाक्षांकित प्रतींसह त्यांच्या सत्यतेबाबत स्वघोषणापत्र सोबत जोडलेल्या प्रपत्र - ब प्रमाणे घेण्यात यावे.

क) **वरील दोन्ही स्वघोषणापत्रे साध्या कागदावर करता येतील त्याकरिता न्यायिक कागदाची आवश्यकता नाही.**

ड) स्वघोषणा प्रमाणपत्रावर नागरिकाने जर चुकीची / खोटी माहिती दिल्यास त्याबाबत संबंधित नागरिकावर भा.दं.वि. मधील तरतूदी तसेच इतर अधिनियमातील तरतूदीनुसार योग्य ती कारवाई केली जाईल, असा स्पष्टपणे उल्लेख विहित नमुन्यातील अर्जामधील अटी व शर्तीमध्ये करण्यात यावा.

इ) स्व घोषणा प्रमाणपत्रावर संबंधित नागरिकाचे सुस्पष्ट तसेच अलिकडच्या काळातील छायाचित्र (फोटो) असावे. उपलब्ध असल्यास त्यावर संबंधित नागरिकाचा आधार क्रमांक देखील नमूद करण्यात यावा.

३. नागरी सुविधा केंद्र

अ) राज्यातील सर्व नागरीक सुविधा केंद्र, महा-ई-सेवा केंद्र, सेतु केंद्र इ. केंद्रामध्ये वरील परि. २) प्रमाणे स्वघोषणा पत्र व कागदपत्रांच्या स्वयंसाक्षांकित प्रती व त्यांच्या सत्यतेबाबत स्वघोषणा पत्र स्विकारण्याची कार्यवाही करावी.

ब) शपथपत्राऐवजी स्वघोषणा पत्र व स्वयंसाक्षांकितप्रती संदर्भात स्वघोषणा पत्र हे अर्जाचाच भाग राहतील ते साध्या कागदावर घेण्यात यावे त्यासाठी न्यायिक कागदाची आवश्यकता नाही.

क) नागरी सुविधा केंद्र महा-ई-सेवा केंद्रामार्फत देण्यात येणा-या सेवांकरिता विकसित केलेल्या संगणकीय प्रणालीमध्ये महा ऑनलाइनने आवश्यक त्या सुधारणा कराव्यात व त्याचा अहवाल माहिती तंत्रज्ञान विभागास तात्काळ सादर करावा.

४. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिनस्त कार्यालयांना वरीलप्रमाणे कार्यवाही करण्याचे निर्देश त्वरीत द्यावेत.

५. हा शासन निर्णय माहिती व तंत्रज्ञान, सामान्य प्रशासन विभाग यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

६. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०३०९१८२५००२७०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Prem Singh Meena

Digitally signed by Prem Singh Meena
DN: c=IN, o=all india services, ou=IAS, postalCode=110003, st=New Delhi, cn=Prem Singh Meena
Date: 2015.03.09 18:36:50 +05'30'

**(डॉ. पी. एस. मीना)**
**अपर मुख्य सचिव (प्र.सु. र. व का.)**

प्रत,

१) मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा / विधानपरिषद.
२) सर्व सन्माननीय विधानसभा, विधानपरिषद व संसद सदस्य,
३) मा. राज्यपालांचे सचिव (५ प्रती),
४) मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव (५ प्रती),
५) सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव,
६) संचालक, माहिती तंत्रज्ञान,
७) सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव / स्वीय सहायक,
८) मुख्य सचिवांचे वरीष्ठ स्वीय सहायक,
९) *मा. महाअधिवक्ता, महाराष्ट्र राज्य,
१०) प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
११) प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,
१२) प्रबंधक , लोकायुक्त व उप लोकायुक्त यांचे कार्यालय,
१३) सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई,
१४) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१५) उप सचिव, विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय, विधान भवन, मुंबई,
१६) उप सचिव, राज्य माहिती आयोग यांचे कार्यालय, मुंबई,
१७) सर्व विभागीय आयुक्त,
१८) सर्व जिल्हाधिकारी,
१९) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
२०) सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख /
२१) प्रादेशिक प्रमुख / कार्यालय प्रमुख,
२२) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई (५ प्रती),
२३) निवड नस्ती.

प्रपत्र-अ

अर्जदाराचा फोटो

स्वयंघोषणापत्र

मी-------------------------------श्री. ------------------------------यांचा मुलगा / मुलगी वय-----
वर्ष, आधार क्रमांक (असल्यास) ----------------------------------------व्यवसाय--------------------
राहणार---------------------------------------- याद्वारे घोषित करतो / करते की, वरील सर्व माहिती माझ्या व्यक्तीगत माहिती व समजूतीनुसार खरी आहे. सदर माहिती खोटी आढळून आल्यास, भारतीय दंड संहिता अन्वये आणि / किंवा संबंधित कायदयानुसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहीन याची मला पूर्ण जाणीव आहे.

ठिकाण :------------------- अर्जदाराची सही-------------------------

दिनांक :------------------- अर्जदाराचे नाव :-------------------------

## प्रपत्र-ब

## स्वयं-साक्षांकनासाठी स्वयं घोषणापत्र

| |
|---|
| अर्जदाराचा फोटो |

मी------------------------------श्री. ------------------------------यांचा मुलगा / मुलगी वय-----

वर्ष, आधार क्रमांक (असल्यास) ----------------------------------------व्यवसाय-------------------

राहणार--------------------------------------- याद्वारे घोषित करतो / करते की, मी स्वयं साक्षांकीत केलेल्या प्रती या मूळ कागदपत्रांच्याच सत्य प्रती आहेत. त्या खोटया असल्याचे आढळून आल्यास, भारतीय दंड संहिता आणि / किंवा संबंधित कायदयानुसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहीन याची मला पूर्ण जाणीव आहे.

ठिकाण :------------------ अर्जदाराची सही-------------------------

दिनांक :------------------ अर्जदाराचे नाव :-------------------------